**PERSONAL COPY**

NOT FOR SALE OR CIRCULATION

# LAKSHYA CAREER ACADEMY

# मराठी व्याकरण व शब्दसंग्रह
## Marathi Grammer & Vocabulary

# लक्ष्य करिअर ॲकेडमी
## FOR MPSC (राज्यसेवा) & PSI, STI, ASO


7887878001 / 7887878002 /groups/77926463145586

www.thelakshyaacademy.in lakshyacareeracademynashik@gmail.com

पत्ता : श्रीनाथ अपार्टमेंट, मुरकुटे लायब्ररी समोर, लेन नं.३, पंडीत कॉलनी, नाशिक-२

# लक्ष्य करिअर अकॅडमी

**For**

**MPSC**

(राज्यसेवा व **PSI, STI, ASO**)

# मराठी व्याकरण व शब्दसंग्रह


* संपादक *

लक्ष्य करिअर अकॅडमी

○ लेखक ○

प्रो.प्रांजल अतुल निकुंभ

# मराठी व्याकरण व शब्दसंग्रह

प्रकाशक

**लक्ष्य करिअर अकॅडमी**

**For MPSC (राज्यसेवा व PSI, STI, ASO)**

पत्ता : श्रीनाथ अपार्टमेंट, मुरकुटे लायब्ररी समोर, लेन नं.३, पंडीत कॉलनी, नाशिक-२

Phone No : **7887878001 / 7887878002**

Email : lakshya career academy nashik@gmail.com

.Facebook : https://www.facebook.com / groups / 77926463145586

○ **लक्ष्य करीयर अकॅडमी**

○ **मुद्रणस्थळ**
नाशिक

○ **आवृत्ती :**
प्रथम आवृत्ती : २०२२

○ **मूल्य :** 250/-

© **लेखकाधीन**

○ **अक्षर जुळवणी :**
सौ.सोनाली सुरेश वाघ

*All rights reserved.No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means,without permission.Any person who does any unauthorised act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.*


# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | नाव | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | ✻ आपली भाषा, लिपी व व्याकरण ✻ | १ |
| २ | ✻ वर्णविचार ✻ | ४ |
| ३ | ✻ वर्णविचार -१ ✻ | १० |
| ४ | ✻ संधी ✻ | १६ |
| ५ | ✻ शब्दांच्या जाती ✻ | २३ |
| ६ | ✻ नाम ✻ | २६ |
| ७ | ✻ लिंगविचार ✻ | ३१ |
| ८ | ✻ वचनविचार ✻ | ३६ |
| ९ | ✻ विभक्ती विचार ✻ | ४१ |
| १० | ✻ सामान्यरुप ✻ | ४४ |
| ११ | ✻ सर्वनाम ✻ | ४९ |
| १२ | ✻ विशेषण ✻ | ५५ |
| १३ | ✻ क्रियापद ✻ | ६१ |
| १४ | ✻ क्रियाविशेषण अव्यय ✻ | ७१ |
| १५ | ✻ शब्दयोगी अव्यय ✻ | ७८ |
| १६ | ✻ उभयान्वयी अव्यय ✻ | ८४ |
| १७ | ✻ केवलप्रयोगी अव्यय ✻ | ९२ |
| १८ | ✻ वाक्यविकार-विभक्तींचे कार्य ✻ | ९७ |
| १९ | ✻ प्रयोग ✻ | ९९ |
| २० | ✻ समास ✻ | ११० |
| २१ | ✻ वाक्यांचे प्रकार ✻ | १२३ |
| २२ | ✻ भाषेचे अलंकार ✻ | १३२ |
| २३ | ✻ वृत्त ✻ | १४१ |
| २४ | ✻ समानार्थी शब्द ✻ | १४८ |
| २५ | ✻ एकाच शब्दाचे भिन्न अर्थ ✻ | १५५ |
| २६ | ✻ विरुद्धार्थी शब्द ✻ | १५७ |
| २७ | ✻ म्हणी व त्यांचे अर्थ ✻ | १६१ |
| २८ | ✻ वाक्यप्रचार ✻ | १७४ |


लक्ष्य करीयर अकॅडमी

आजच्या अत्युच्च स्पर्धेच्या युगात वाढती बेरोजगारी,खाजगी नोकरीतील अस्थिरता यामुळे सरकारी नोकरीकडे तरुणांचा वाढता कल,यातुनच समाजाविषयी आत्मीयता बाळगणारे, वास्तवाचे भान ठेवणारे, स्वच्छ चारित्र्याचे सक्षम अधिकारी निर्माण करण्यासाठी उभारलेली शैक्षणिक चळवळ म्हणजेच **"लक्ष्य करिअर अकॅडमी"**

## परिक्षेचे स्वरुप




| बॅच | सुरु होण्याचा दिनांक | कालावधी |
|---|---|---|
| १) **राज्यसेवा** (Foundation) | १० जून | १ वर्ष |
| २) **PSI / STI / ASO** (Foundation) | १५ जून | १ वर्ष |
| ३) **राज्यसेवा** (Foundation English medium) | १५ जून | १ वर्ष |
| ४) **राज्यसेवा** (Fast track) | १० डिसेंबर | ५ महिने |
| ५) **PSI / STI / ASO** (Fast track) | १५ डिसेंबर | ५ महिने |
| ६) **राज्यसेवा** (Foundation English medium) | १५ डिसेंबर | ५ महिने |

*** मराठी व्याकरण ***

## प्रकरण.१ आपली भाषा, लिपी व व्याकरण

* भाषा म्हणजे विचार, भावना, अनुभव व कल्पना व्यक्त करण्याचे साधन असते.

* भाषा मुख्यत: दोन प्रकारची आहे.

१) स्वाभाविक किंवा नैसर्गिक

२) कृत्रिम किंवा सांकेतिक

मनुष्यप्राण्याची बोलण्याची किंवा हावभावाची भाषा यांचा समावेश नैसर्गिक भाषेत होतो. भाषा हा शब्द ' भाष् ' या संस्कृत धातूपासून आला असून त्याचा अर्थ बोलणे असा होतो. ज्याप्रमाणे आपण बोलतो तसेच आपण आपले विचार लिहूनही दाखवतो. लिहीण्यासाठी आपण लिपीचा वापर करतो.

भाषा हे संवादाचे प्रभावी माध्यम आहे. बोलणारा आणि ऐकणारा यांना जोडणारा पूल म्हणजे भाषा होय. आपले विचार, भावना, कल्पना, अर्थच्छटा नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी भाषेवरील प्रभुत्व आवश्यक असते.

संस्कृत भाषा ही मराठीची जननी आहे. मराठी भाषेतील पहिला शिलालेख कर्नाटकातील गोमटेश्वराच्या श्रवण बेळगोळ येथील मूर्तीखाली आढळतो. गंग राजघराण्यातील चावुंडराया या मंत्र्याने इ.स.९७८ ते इ.स.९९३ या कालखंडात ही मुर्ती घडवून घेतली. ही मुर्ती अखंड पाषाणातून कोरलेल्या मूर्तीपैकी जगातील सर्वात उंच मूर्ती आहे, असे मानले जाते. हे स्थळ युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केले आहे. 'श्री चामुण्डरायें करवियले' ही शिलालेखातील ओळ म्हणजे मराठीतील पहिले उपलब्ध वाक्य आहे. यामुर्तीच्या पायथ्याशी मराठी, कन्नड भाषांतील शिलालेख आहेत.

| ग्रंथ | ग्रंथकार |
|---|---|
| १) विवेकसिंधू | मुकुंदराज |
| २) ज्ञानदेवी | ज्ञानेश्वर |
| ३) अमृतानुभव | ज्ञानेश्वर |
| ४) लिळाचरित्र | म्हाइंभट |

* <u>द ग्रामर ऑफ मराठी लॅंग्वेज</u> : मराठी व्याकरणाचे पहिले पुस्तक विल्यम कॅरी यांनी १८०५ मध्ये लिहिले.

* मराठी व्याकरणाचे पहिले पुस्तक दादोबा पांडूरंग तर्खडकर यांनी १८३६ मध्ये लिहीले.त्यांना मराठी भाषेचे पाणिनी म्हणतात.

* मराठी व्याकरणाचा चिकित्सक, तर्कशुद्ध अभ्यास व 'शास्त्रीय मराठी व्याकरण' या पुस्तकाचे लेखक मोरो केशव दामले होत.

* विष्णूशास्त्री चिपळूणकर : मराठी भाषेचे शिवाजी.

* तृतीयरत्न : मराठीतील पहिले सामाजिक नाटक.

* ६ जानेवारी १८३२ : दर्पण : मराठीतील पहिले वृत्तपत्र.

* आधुनिक मराठी कवितेचे जनक : कृष्णाजी केशव दामले (केशवसुत)

* मराठीतील पहिली सामाजिक कांदबरी यमुना पर्यटन : बाबा पद्मनजी.

* आधुनिक मराठी नाटयसृष्टीचे जनक : विष्णूदास भावे.

* आधुनिक मराठी कादंबरी व नाटयसृष्टीचे जनक : ह.ना.आपटे.

* मराठी भाषा इंडो-युरोपियन या कुळातील आहे.

* १९६० मध्ये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती महामंडळाची स्थापना केली.

* देवनागरी लिपी असणाऱ्या भाषा : संस्कृत, मराठी, गुजराती, हिंदी, पाली, बंगाली.

* मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे.

* २७ फेब्रुवारी हा जेष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस जागतिक मराठी भाषा दिन म्हणून साजरा करतात.

*** <u>बोली भाषा</u> :**

एखादया प्रादेशिक भागात सर्वसामान्यांना कळेल अशी भाषा म्हणजे 'बोली भाषा' होय. बोली भाषेला स्वतंत्र लिपी नसते.

## २. वर्णविचार

* कोणताही विचार पूर्ण अर्थाचा असला की त्याला 'वाक्य' असे म्हणतात. वाक्य म्हणजे पूर्ण अर्थाचे बोलणे.
* 'बदक पाण्यात पोहते' या वाक्यात तीन शब्द आहेत. या शब्दांना पद असेही म्हणतात.
* ठराविक क्रमाने आलेला अक्षरांच्या समूहाला काही अर्थ प्राप्त झाला तर त्याला शब्द असे म्हणतात. (ब,द,क–बदक)
* अक्षरे या आपल्या ध्वनीच्या किंवा आवाजांच्या खूणा आहेत. म्हणून अक्षरांना 'ध्वनिचिन्हे' असे म्हणतात.
* बदक या शब्दातील ब हा मूलध्वनी नाही. ब्+अ हे दोन मूलध्वनी एकत्र आलेले आपल्याला आढळतील.
* तोंडावाटे निघणाऱ्या मूलध्वनींना आपण 'वर्ण'असे म्हणतो. हे ध्वनी हवेत विरतात व नाहीसे होतात. ते नष्ट होऊ नये म्हणून आपण लिहून ठेवतो म्हणून अक्षर म्हणतात.

**✱ वर्णांचे प्रकार :**

१) **स्वर** : स्वृ–म्हणजे उच्चार करणे, ध्वनी करणे.
अ,आ,इ,ई,उ,ऊ,ऋ,लृ,ए,ऐ,ओ,औ या बारा वर्णांना स्वर म्हणतात.

स्वरांचा उच्चार करतांना ओठांच्या किंवा जीभेच्या विविध हालचाली होत असतात. पण ओठांचा एकमेकांशी किंवा जीभेच्या कोणत्याही भागाचा मुखातील कोणत्याही अवयवाशी स्पर्श न होता मुखावाटे जे ध्वनी बाहेर पडतात, त्यांना 'स्वर' म्हणतात. त्यांचा उच्चार तोंडावाटे सहज व स्वतंत्रपणे होतो. उच्चार करतांना आपले तोंड उघडे व पसरलेले असते. स्वरोच्चाराच्यावेळी हवेचा मार्ग अडवलेला नसतो. स्वर म्हणजे नुसतेच सुर.

२) **स्वरादी** : अं व अ : या दोन वर्णांना स्वरादी म्हणतात. यामध्ये अनुस्वार व विसर्ग यांचा उच्चार करतांना या वर्णांच्या अगोदर स्वर येतो म्हणून त्यांना स्वरादी म्हणतात.

उदा. अंगण = अ+ अनुस्वार = अं
शंकर = श+ अनुस्वार = शं
मन:स्थिती = न् + अ + विसर्ग = न :

**अनुस्वार** : अनुस्वाराचा उच्चार स्पष्ट व खणखणीत होतो.यालाच अनुस्वार म्हणतात. उदा.गंगा, आंबा तर यातील ओझरत्या, अस्पष्ट उचारांना अनुनासिक असे म्हणतात. उदा. हं, देवांनी

**विसर्ग** : विसर्ग म्हणजेच श्वास सोडणे.

**नवे स्वरादी** : इंग्रजी भाषेचा संपर्क आल्यावर त्याचा प्रभाव आपल्या भाषेवर पडला. उदा. बॅट, बॉल, फॅशन, ऑगस्ट. २००९ च्या शासननिर्णयानुसार ॲ व ऑ हे दोन नवीन स्वर मराठी वर्णमालेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

३) **व्यंजन** : वर्णमालेमध्ये क्, ख्,........ह्, ळ् सर्व व्यंजने आहेत. यांचा स्वतंत्र्यपणे उच्चार करता येत नाही. हे अपूर्ण उच्चाराचे असतात म्हणून ते पाय मोडून लिहीतात.

**अक्षरे** : पूर्ण उच्चारले जाणारे वर्ण म्हणजेच अक्षरे होत. सर्व स्वर पूर्ण उच्चाराचे आहेत तसेच व्यंजनामध्ये स्वर मिसळून अक्षरे तयार होतात.

उदा. क्+अ = क, ख्+अ = ख

**बाराखडी** : प्रत्येक व्यंजनात अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ हे दहा स्वर व अं,अ: हे स्वरादी मिसळून आपण बारा अक्षरे तयार करतो. त्यांना आपण बाराखडी किंवा बाराक्षरी म्हणतो.

उदा.

| वर्ण | अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अ: |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बाराखडी | क | का | कि | की | कु | कू | के | कै | को | कौ | कं | क: |

**स्वरांचे प्रकार :**

१) **ऱ्हस्व स्वर** : या स्वरांचा उच्चार आखूड होतो. त्यांचा उच्चार करण्यासाठी कमी वेळ लागतो.
उदा. अ, इ, उ, ऋ, लृ

२) **दीर्घ स्वर** : या स्वरांचा उच्चार लांबट होतो. त्यांचा उच्चार करण्यासाठी जास्त वेळ लागतो.
उदा. आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ.

१६) श, ष, स ही कोणत्या प्रकारची व्यंजने आहेत?
१) अंतस्थ व्यंजने २) उष्म व्यंजने
३) मूर्धन्य व्यंजने ४) तालव्य व्यंजने

१७) संयुक्त स्वर म्हणजे............
१) सर्व स्वर एकत्र येणे २) सर्वांनी मिळून आवाज काढणे
३) दोन स्वर एकत्र येऊन निर्माण झालेले ४) ऱ्हस्व उच्चार असलेले

१८) मराठीत एकूण किती स्वर आहेत?
१) आठ २) दहा ३) बारा ४) चौदा

१९) 'अं' व 'अः' हे.........आहेत.
१) व्यंजनादी २) व्यंजन ३) स्वरादी ४) व्यंजनात

२०) 'ए' हा स्वर कोणत्या प्रकारात मोडतो?
१) विजातीय स्वर २) संयुक्त स्वर
३) दीर्घ स्वर ४) व्यंजनयुक्त स्वर

२१) समानस्थानी, समान प्रयत्नाने उत्पन्न होणाऱ्या स्वरांना काय म्हणतात?
१) संयुक्त स्वर २) व्दिगुणित स्वर
३) सजातीय स्वर ४) असवर्ण स्वर

२२) खालीलपैकी संयुक्त स्वर कोणता?
१) आ २) ओ ३) ई ४) उ

२३) व्यंजनांना अक्षरत्व येण्यासाठी काय करावे?
१) दोन व्यंजनांचे एकत्रीकरण २) व्यंजन व स्वर यांचे एकत्रीकरण
३) दोन स्वरांचे एकत्रीकरण ४) व्यंजनांमधून स्वर काढून टाकणे

२४) पुढीलपैकी स्वरादी वर्ण ओळखा.
१) इ–उ २) अ–आ ३) अं–अः ४) ए–ओ

२५) 'मुळाक्षरे' यासाठी पर्यायी शब्द कोणता आहे?
१) शब्द २) वर्णमाला ३) वर्णसंख्या ४) वर्णनामाला

२६) 'ओ' हा स्वर कोणत्या प्रकारचा आहे?
१) संयुक्त २) ऱ्हस्व ३) दीर्घ ४) स्वरादी

२७) अक्षरमालेत एकूण किती स्वर आहेत?
१) ४८ २) १२ ३) १३ ४) १८

२८) य्, र्, ल्, व्, या व्यंजनांना काय म्हणतात?
१) अर्धस्वर २) उष्मे ३) विसर्ग ४) स्वरादी

२९) 'वर्णमाला' कशी बनते?
१) स्वर, स्वरादी आणि व्यंजने अशा सर्व प्रकारच्या वर्णांची क्रमवार मालिका
२) एक स्वर आणि दोन व्यंजने मिळून
३) टाळू, दात आणि ओठ मिळून
४) कंठातून उच्चार करता येणारा ध्वनी मिळून

३०) खालील व्यंजन गटातील अनुनासिकांचा योग्य गट ओळखा.
१) ड, त्र, न, ण, म २) ड्, त्र्, ण्, न्, म्
३) ङ, ण, न, भ, अ ४) ङ, ण, न, म, ञ

३१) खाली काही स्वर दिले आहेत.त्यातील काही संयुक्त स्वर आहेत.ते दाखविण्याची सोय पर्यायी उत्तरांतून शोधा.
ब) अ, आ क) इ, उ ड) ए, ऐ ई) ओ, औ

**पर्यायी उत्तरे :**
१) ब आणि ड २) क आणि इ ३) फक्त क ४) ड आणि इ

उदा :

मनस् + पटल = मन:पटल

तेजस् + कण = तेज:कण

**५) नियम :**

पदाच्या शेवटी 'र्' येऊन त्याच्यापुढे कठोर व्यंजन आल्यास त्या 'र्' चा विसर्ग होतो.

उदा :

अंतर् + करण = अंत:करण

चतुर् + सुत्री = चतु:सुत्री

**६) नियम :**

विसर्गाच्या ऐवजी येणाऱ्या 'र्' च्या मागे 'अ' व पुढे मृदू वर्ण आल्यास तो 'र्' तसाच राहून संधी होतो.

उदा :

पुनर् + जन्म = पुर्नजन्म, अंतर् + आत्मा = अंतरात्मा

**७) नियम :**

विसर्गाच्या मागे 'अ' हा स्वर असुन पुढे क्, ख्, प्, फ् यापैकी एखादे व्यंजन आले,तर विसर्ग कायम राहतो. यात पुढे अन्य स्वर आला, तर विसर्ग लोप पावतो.

उदा :

अता + एव = अतएव; प्रात: + काल = प्रात:काल

**८) नियम :**

विसर्गाच्या मागे 'इ' किंवा 'उ' असून पुढे क्, ख्, प्, फ् यापैकी कोणताही वर्ण आल्यास विसर्गाचा 'ष्' होतो.

उदा :

दु: + कृत्य = दुष्कृत्य; नि: + पाप = निष्पाप

**९) नियम :**

विसर्गाच्या पुढे च्, छ् आल्यास विसर्गाचा श् होतो आणि त्,थ् आल्यास विसर्गाचा 'स्' होतो.

उदा :

नि: + तेज = निस्तेज; मन: + ताप = मनस्ताप

नि: + चल = निश्चल

**१०) नियम :**

विसर्गाच्या पुढे श्,स् आल्यास विसर्ग विकल्पाने कायम राहतो किंवा लोप पावतो.

उदा :

दु: + शासन = दु:शासन

नि: + संदेह = नि:संदेह

प्रात: + समय = प्रात:समय

अंत: + स्थ = अंतस्थ

*** विशेष प्रकारचे संधी :**

१) मराठीत कधी–कधी दोन स्वर एकापुढे एक आले असता त्यांतील पहिला स्वर न बदलता तसाच राहतो व दुसरा स्वर लोप पावतो.

उदा :

काही + असा = काहीसा, केले + असे = केलेसे

नदी + आत = नदीत

यालाच 'पूर्वरुप संधी' म्हणतात.

## ६. नाम

✱ **नाम :** प्रत्यक्षात असणाऱ्या किंवा कल्पनेने जाणलेल्या वस्तूंना किंवा त्यांच्या गुणधर्माला दिल्या जाणाऱ्या नावांना नाम असे म्हणतात.

उदा. नदी, पर्वत, कागद, मुलगी, देव, मानव, सौंदर्य, उदारता इ.

✱ **नामांचे तीन प्रकार–सामान्यनाम, विशेषनाम, भाववाचक नाम.**

✱ **सामान्यनाम :**

समान जातींच्या पदार्थातील समान गुणधर्मामुळे त्या वस्तुला जे सर्वमान्य नाव दिले जाते, ते म्हणजे सामान्यनाम.

उदा. मुलगी, पर्वत, झरा, फुल.

**१) समुदायवाचक नाम :**

समुहाला दिलेली नावे.

उदा. कळप, सैन्य, वर्ग, समिती

**२) पदार्थवाचक नाम :**

संख्येशिवाय इतर परिमाणाने मोजण्याचे पदार्थ

उदा. चांदी, बासुंदी, रवा, कापड

✱ **विशेषनाम :**

या नामाने वस्तूच्या जातीचा बोध होत नसून त्या जातीतील एका विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध होतो.

उदा. आशिष, हिमालय, सिंधू, अमेरिका.

✱ **भाववाचक नाम :**

या नामाने प्राणी वा वस्तू यांच्यामधील गुण,धर्म किंवा भाव यांचा बोध होतो. यांनाच धर्मवाचक नाम असेही म्हणतात.

उदा. सौंदर्य, आपुलकी.

भाववाचक नामांना वेगळे अस्तित्व नसुन त्यांना कल्पनेत जाणलेले असते.भाववाचक नामे पदार्थाची स्थिती वा क्रिया दर्शवितात.

सामान्यनामाचे अनेकवचन होऊ शकते पण विशेषनामे आणि भाववाचक नामे एकवचनीच असतात.

सामान्यनामे व विशेषनामे यांना ते धर्म वा गुण व्यक्त करत असल्याने धर्मिवाचक नामे असे म्हणतात.

सामान्यनामे व विशेषनामांना आई, ई, की, पण, पणा, य, वा, ता, त्व असे प्रत्यय लावून भाववाचक नामे तयार करतात.

लक्ष्य करीयर अकॅडमी

| शब्द | प्रत्यय | भाववाचक नाम |
|---|---|---|
| चपळ | आई | चपळाई |
| गोड | ई | गोडी |
| आपुले | की | आपुलकी |
| फसवे | गिरी | फसवेगिरी |
| मित्र | त्व | मित्रत्व |
| सुंदर | य | सौंदर्य |
| ओला | वा | ओलावा. |

✱ **इतर शब्दांद्वारे नामाचे कार्य :**

१) सामान्यनाम हे विशेषनामाचे कार्य करते.

उदा. मी आत्ताच नगरहून आलो
शेजारची माला यंदा पास झाली.

२) विशेषनाम कधी कधी सामान्यनामाचे कार्य करते.

उदा. आम्हांला आज भीम हवेत.
हा व्यक्ती कुंभकर्णच दिसतो.

II) **नियम :** ईकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन तेच राहते.

उदा.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| पाणी | पाणी |
| लोणी | लोणी |
| दही | दही |

III) **नियम :** उकारान्त आणि ऊकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन एकारान्त होते. क्वचित प्रसंगी वेकारान्त होते.

उदा.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| लेकरु | लेकरे |
| पाखरु | पाखरे |
| वासरु | वासरे |
| पिलू | पिले |
| लिंबू | लिंबे |
| आसू | आसवे |

IV) **नियम :** एकारान्त नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन ईकारान्त होते.

उदा.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| केळे | केळी |
| मडके | मडकी |
| रताळे | रताळी |
| खेडे | खेडी |
| गाणे | गाणी |
| नाणे | नाणी |

लक्ष्य करीयर अकॅडमी

**✱ विशेष बाबी :**

✱ सामान्यनामाचे अनेकवचन होते

✱ विशेषनामे व भाववाचक नामे या नामांची अनेकवचने होत नाही मात्र त्यांची अनेकवचने केल्यास / झाल्यास सामान्यनामे म्हणून वापरली जातात.

उदा. १) गुरुजी वर्गात शिकवतात.

२) बाबा तुम्ही इकडे या.

✱ काही नामे नेहमी अनेकवचनीच वापरतात.

उदा. १) कांजण्या, रोमांच, डोहाळे

✱ विपुलता दाखविण्यासाठी काही शब्दांचे एकवचन वापरतात.

उदा.१) यंदा खूप आंबा झाला.

२) आमच्याजवळ खूप पैसा आहे.

✱ समुह हा एकच मानला जात असल्यामुळे ती एकवचनी असतात.

उदा. ढीग, सैन्य, मंडळ, समिती

✱ अधिक जवळीक दाखविण्यासाठी, वयाने मोठया व्यक्तींबाबत एकवचन वापरण्यात येते.

उदा. १) दादा आज घरी लवकर ये २) बाबा गावाला गेला.

१२) नामाच्या ठिकाणी जो संख्या सुचविण्याचा धर्म आहे. त्याला काय म्हणतात?
१) संख्याविशेषण २) वचन
३) सामान्यनाम ४) सामान्यरुप

१३) अकारान्त स्त्रीलिंगी नामांचे अनेकवचन........होते.
१) आकारान्त २) याकारान्त
३) ईकारान्त ४) वाकारान्त

१४) पुढीलपैकी शब्दातील समूह मानला जात असल्यामुळे एकवचनी नसणारे शब्द कोणते?
१) ढिग २) रास
३) जोडपे ४) मंडळ

१५) अनेकवचन संदर्भात पर्यायी उत्तरांतील गटाबाहेरचे उत्तर ओळखा?
१) केळे २) गाणे ३) तांबे ४) रताळे

१६) 'गुरुजी शाळेत आत्ताच आले' हे वाक्य व्याकरण दृष्ट्या..........
अ) अनेकवचनी आहे. ब) आदरार्थी आहे.
क) आदरार्थी अनेकवचन आहे. ड) आदरार्थी बहुवचन आहे.

**पर्यायी उत्तरे :**
१) अ व ब बरोबर २) क व ड बरोबर
३) अ व क बरोबर ४) ब व ड बरोबर

लक्ष्य करीयर अकॅडमी

| प्रश्न.क्र. | उत्तर | प्रश्न.क्र. | उत्तर | प्रश्न.क्र. | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | २ | १३ | १ |
| २ | १ | ८ | ४ | १४ | ३ |
| ३ | ३ | ९ | २ | १५ | १ |
| ४ | १ | १० | ३ | १६ | २ |
| ५ | २ | ११ | २ | | |
| ६ | २ | १२ | २ | | |

३०) जोडया जुळवा.

| | |
|---|---|
| अ) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय | i) व्याकरण म्हणजे भाषेच्या रचनेचे शास्त्र होय. |
| ब) उद्‌देशबोधक उभयान्वयी अव्यय | ii) माझ्याजवळ पैसे नाहीत सबब मी येणार नाही. |
| क) स्वरुपबोधक उभयान्वयी अव्यय | iii) बाळ झोपला की मी लगेच येईन. |
| ड) संकेतबोधक उभयान्वयी अव्यय | iv) मुले सुरक्षित घरी यावीत यासाठी रिक्षाने आलो. |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | ii | iv | i | iii |
| २) | iii | iv | i | ii |
| ३) | iv | i | iii | ii |
| ४) | ii | iii | iv | i |

३१) प्रधानत्वसुचक उभयान्वयी अव्ययाचे प्रकार ओळखा.

अ) विकल्पबोधक
ब) उद्‌देशवाचक
क) परिणामबोधक
ड) संकेतदर्शक

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ व ब बरोबर
२) फक्त अ व क बरोबर
३) फक्त ब व क बरोबर
४) फक्त ब व ड बरोबर

३२) 'विजा चमकु लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली.' या वाक्यातील 'आणि' या अव्ययास काय म्हणतात?

१) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय
२) समुच्चबोधक उभयान्वयी अव्यय
३) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय
४) उद्‌देशबोधक उभयान्वयी अव्यय

लक्ष्य करीयर अकॅडमी

३३) अचूक वाक्यांची जोडी ओळखा.

a) विजा चमकु लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली- विकल्पबोधक अव्यये
b) लोक आपली स्तुती करोत अथवा निंदा- समुच्चयबोधक अव्यये
c) मरावे परि किर्तीरुपे उरावे- न्यूनत्वबोधक अव्यये
d) वाटेत मोटार नादुरुस्त झाली झाली म्हणून यावयास उशीर झाला- परिणामबोधक अव्यये

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a) बरोबर
२) केवळ (b) व (c) बरोबर
३) केवळ (c) व (d) बरोबर
४) सर्व योग्य

३४) पण, परंतु, परी ही कोणत्या प्रकारची उभयान्वयी अव्यये आहेत?

**पर्यायी उत्तरे :**

१) समुच्चबोधक
२) विकल्पबोधक
३) परिणामबोधक
४) न्यूनत्वबोधक

२१) 'काल रात्री म्हणे गारा पडल्या.' म्हणे या शब्दाचा प्रकार ओळखा.

अ) शब्दयोगी अव्यय ब) उभयान्वयी अव्यय

क) केवलप्रयोगी अव्यय ड) क्रियाविशेषण अव्यय

**पर्यायी उत्तरे :**

१) अ बरोबर बाकी सर्व चूक
२) ब बरोबर बाकी सर्व चूक
३) क बरोबर बाकी सर्व चूक
४) ड बरोबर बाकी सर्व चूक

२२) केवलप्रयोगी अव्यये ही..........

१) दोन वाक्ये जोडण्याचे काम करतात.
२) आपल्या उत्कट भावना व्यक्त करतात.
३) केवलप्रयोगी अव्यये विकारी असतात.
४) शब्दाचा वाक्याशी असलेला संबंध दर्शवितात.

२३) पुढील केवलप्रयोगी अव्ययाचा प्रकार कोणता?

'ठीक'

**पर्यायी उत्तरे :**

१) मौनदर्शक २) तिरस्कारदर्शक
३) विरोधदर्शक ४) संमतीदर्शक

२४) अगं, अरे, ऐ, अहो ही कोणत्या केवलप्रयोगी अव्ययाची उदाहरणे आहेत?

१) मौनदर्शक २) संबोधनदर्शक ३) संमतीदर्शक ४) शोकदर्शक

२५) 'वा ! वा ! छान निबंध लिहीला आहेस तू !' या वाक्यात केवलप्रयोगी अव्ययाचा कोणता प्रकार आलेला आहे?

१) प्रशंसादर्शक २) विरोधदर्शक
३) मौनदर्शक ४) संमतीदर्शक

२६) पर्यायी उत्तरांतून 'व्यर्थ उद्‌गारवाची अव्यय' असणारे वाक्य शोधा.

१) राम राम ! काय हा प्रसंग !
२) तो आपला काहीतरी बोलतो !
३) अबब ! केवढी ही रास !
४) वाहवा ! काय मजेदार देखावा !

२७) जोडया जुळवा.

| **अ गट** | **ब गट** |
|---|---|
| अ) संबोधनदर्शक केवलप्रयोगी अव्यय | i) भले |
| ब) प्रशंसादर्शक केवलप्रयोगी अव्यय | ii) अगे |
| क) विरोधदर्शक केवलप्रयोगी अव्यय | iii) इश्श |
| ड) तिरस्कारदर्शक केवलप्रयोगी अव्यय | iv) हॅट |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (१) | ii | i | iv | iii |
| (२) | ii | i | iii | iv |
| (३) | ii | iii | i | iv |
| (४) | ii | iv | i | iii |

२३) खालील वाक्यातील प्रयोग ओळखा.

' मांजराकडून उंदीर मारला गेला.' प्रयोग ओळखा.

१) प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग
२) भावे प्रयोग
३) कर्मणी प्रयोग
४) कर्तरी प्रयोग

२४) पुढील वाक्यातील 'प्रयोग' ओळखा.

'आईवडीलांनी मुलांना मायेने वाढविले.'

१) कर्तरी प्रयोग २) कर्मणी प्रयोग
३) भावे प्रयोग ४) संकरीत प्रयोग

२५) खालील वाक्यातील प्रयोग ओळखा.

'परिजातकाची योजना करणारा कवी खरोखराच कल्पक असला पाहिजे.'

१) कर्तरी प्रयोग २) भावे प्रयोग
३) कर्मणी प्रयोग ४) संकीर्ण प्रयोग

२६) खालील वाक्याचा प्रयोग ओळखा.

'थोरांकडून सत्य बोलले जाते.'

१) प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग २) कर्तरी प्रयोग
३) भावे प्रयोग ४) नवीन कर्मणी प्रयोग

२७) 'मला जिना चढवतो.' या वाक्यातील प्रयोग कोणता आहे?

१) कर्तरी प्रयोग २) कर्मकर्तरी प्रयोग
३) शक्य कर्मणी ४) समापन कर्मणी

२८) ज्या प्रयोगात कर्ता प्रथमान्त व कर्म प्रथमान्त किंवा व्दितीयान्त असते. अशा प्रयोगाला.......म्हणतात?

१) कर्तरी प्रयोग २) कर्मणी प्रयोग
३) भावे प्रयोग ४) संकीर्ण प्रयोग

२९) 'तू मला पुस्तक दिलेस.' हे वाक्य कोणत्या प्रयोगातील आहे?

१) कर्तृ- कर्म संकर २) भावकर्तरी प्रयोग
३) कर्तरी प्रयोग ४) कर्तृ- भाव संकर प्रयोग

३०) क्रियापदाचे रुप कर्ता व कर्म यांच्या लिंगवचन पुरुषाप्रमाणे बनलेले नसते. तेव्हा.......प्रयोग होतो.

१) अकर्मक कर्तरी प्रयोग २) शक्य कर्मणी प्रयोग
३) कर्तृकर्म संकर प्रयोग ४) भावे प्रयोग

३१) 'विदयार्थी अभ्यास करतो'- प्रयोग ओळखा.

१) सकर्मक कर्तरी प्रयोग २) अकर्मक कर्तरी प्रयोग
३) प्रधानकर्तृक कर्मणी प्रयोग ४) कर्मणी प्रयोग

३२) मराठी 'प्रयोग व्यवस्थेत' कर्मणी प्रयोगाविषयी पुढील काही मते मांडली आहेत. ती अशी-

अ) कर्ता प्रथमान्त असतो.
ब) कर्माप्रमाणे क्रियापद असते.
क) कर्म प्रथमांत असते.
ड) नवीन कर्मणी प्रयोगात कर्त्याला 'कडून' हा शब्दयोगी अव्यय लावत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ, ब २) फक्त ब, क
३) फक्त अ, ड ४) फक्त अ, क, ड

५९) योग्य जोडया लावा.

| अ गट | ब गट |
|---|---|
| A) मनुष्य फळ खातो | अ) कर्मणी प्रयोग |
| B) रामाने फळ खाल्ले | ब) कर्तरी प्रयोग |
| C) देवाने भक्तास तारले | क) संकर प्रयोग |
| D) आईने मुलीस निजविले | ड) भावे प्रयोग |

**पर्यायी उत्तरे :**

(1) d- इ, c- ई, a- ड, b- क
(2) a- क, b- ड, c- इ, d- ई
(3) d- इ, c- क, b- ई, a- ड
(4) c- क, d- इ, b- ई, a- ड

६०) कर्मणी प्रयोगाच्या कोणत्या उपप्रकारात कर्त्याला 'कडून' हे शब्दयोगी अव्यय जोडून वाक्यरचना केली जाते?

१) प्रधानकर्तृक कर्मणी २) शक्य कर्मणी
३) समापन कर्मणी ४) कर्म कर्तरी

६१) पुढील विधाने वाचा.

अ) कर्तरी प्रयोगात क्रियापद हे कर्त्यांच्या तंत्राप्रमाणे चालते.
ब) कर्मणी प्रयोगात कर्ता हा प्रथमान्त कधीच नसतो.
क) भावे प्रयोगात कर्ता किंवा कर्म हे दोन्ही गौण असतात.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ बरोबर २) अ, ब व क बरोबर
३) ब चूक, अ व क बरोबर ४) अ, ब व क चूक

६२) पुढील विधाने वाचा.

अ) कर्मणी प्रयोगात कर्ता प्रथमान्त असतो.
ब) कर्मकर्तरी प्रयोगालाच नवीन कर्मणी असे म्हणतात.
क) 'त्याची गोष्ट लिहून झाली.' समापन कर्मणी प्रयोगाचे उदाहरण आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) अ व ब चूक २) फक्त अ चूक
३) फक्त ब व क चूक ४) अ, ब व क बरोबर

६३) संकर प्रयोगात कर्ता......नसतो.

अ) व्दितीय पुरुषी ब) प्रथम पुरुषी
क) तृतीय पुरुषी

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ बरोबर २) फक्त ब बरोबर
३) फक्त क चूक ४) अ व क बरोबर

६४) पुढील विधाने वाचा.

अ) ज्या प्रयोगात क्रियापद स्वतंत्र, एकवचनी, तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी असते, तेव्हा भावे होतो.
ब) भावकर्तरी प्रयोगात कर्ताही नसतो कर्मही नसते.
क) भावे प्रयोग सर्व काळात होतो.

लक्ष्य करीयर अकॅडमी

## २४. समानार्थी शब्द

१) हिकमत – युक्ती, चातुर्य, मसलत, कावा
२) हुरुप – उत्साह, हुशारी, जोम
३) हुरहूर – रुखरुख, चिंता, काळजी, चुटपूट
४) हैबन – दहशत, दरारा, धास्ती
५) होडी – नाव, नौका, तर, तरी
६) क्षय – नाश, ऱ्हास, झीज
७) क्षोद – पूड, चूर्ण, भुकटी
८) ज्ञान – विद्या
९) ज्ञाता – सुज्ञ, शहाणा, जाणकार, विव्दान
१०) अभिनय – हावभाव, अंगविक्षेप
११) अशुभ – वाईट, अमंगल
१२) अस्थिर – चंचल, क्षणिक
१३) आधी – अगोदर,प्रथम
१४) आठवण – स्मरण,स्मृती
१५) कठोर – निर्दयी,निष्ठुर
१६) कष्ट – श्रम,मेहनत
१७) कठीण – अवघड, बिकट
१८) किनारा – काठ, तीर
१९) कुत्रा – श्वान
२०) खेडे – ग्राम, गाव
२१) खेडूत– गावकरी, ग्रामस्थ
२२) गोड – मधुर
२३) घास – कवळ, ग्रास
२४) चांदी – रुपे, रजत
२५) ढेकूण – मत्कुण, खटमल
२६) तलवार – खड्ग,समशेर
२७) तक्ता नकाशा,कोष्टक
२८) नड – अडचण,तंगी
२९) तारांबळ – धांदल,घाई
३०) तालेवार – श्रीमंत,धनिक
३१) साच – खरा, खरोखर, खराखुरा
३२) सिंह – मृगेश, वनराज, केसरी, मृगेंद्र, मृगराज, पंचानन
३३) सुवासिनी – सौभाग्यवती, सवाष्ण
३४) सुरेख – सुंदर, रम्य, मनोहर, रमणीय, ललित
३५) सूर्य – रवी, भास्कर, मित्र, भानु, दिनकर, आदित्य, सविता, अर्क, दिनमणी
३६) स्वेत – पूल, सेतू, साकव
३७) सैन्य – फौज, लष्कर, सेनाव, कटक, चमू
३८) इशारा – सूचना, खूण
३९) उत्साह – आवेश, उर्मी, जोश
४०) एकमोडी – एककल्ली, एकमार्गी
४१) एकाएकी – एकदम, अवचित, अचानक
४२) ओढा – नाला, प्रवाह
४३) औखळ – अवखळ, खोडकर
४४) औस – अमावस्या, अवस
४५) औक्ष – आयुष्य, जीवित
४६) सोने – सुवर्ण, कनक, कांचन, हम, हिरण्य
४७) सौकार्यता – सुलभता, सुकरता
४८) सौदा – व्यापार, व्यवहार, देवघेव
४९) हत्ती – गज, कुंजर, हस्ती
५०) हरिण – मृग, सारंग, कुरंग, काळवीट
५१) हयगय – हेळसांड, दुर्लक्ष, ढिलाई, दिरंगाई
५२) हर्ष – आनंद, मोद, आमोद, उल्हास
५३) हात – कर, हस्त, पाणि, भुज, बाहू
५४) वखार – कोठार, गोदाम
५५) वकील – प्रतिनिधी
५६) वाघ – व्याघ्र, शार्दूल
५७) वास – सुगावा, खूण
५८) शस्त्र – हत्यार, आयुध
५९) शरम – लाज, लज्जा
६०) शर्यत – स्पर्धा, चढाओढ
६१) ऐदी – आळशी, मंद, सुस्त
६२) ऐट – नखरा, डौल, ताठा, मिजास, दिमाख, रुबाब
६३) ऐषआराम – चैन, सुखोपभोग
६४) ऐसपैस – विस्तीर्ण, प्रशस्त, अमर्याद
६५) ओबडधोबड – बेडौल, खडबडीत, रांगडे
६७) ओझे – भार, बोजा, वजन, जबाबदारी, काळजी
६८) ओढ – लोंगर, टरफल
६९) ओढाळ – उनाड, भटक्या
७०) अंत – शेवट, मरण, मृत्यू, अखेर
७१) अंगार – विस्तव, निखारा, इंगळ
७२) अंधूक – पुसट, अस्पष्ट, मंद
७३) उषा– उषःकाल, पहाट, अरुणोदय, प्रातःकाल, प्रभात, सकाळ

लक्ष्य करीयर अकॅडमी

३६२) तज्ज्ञ – माहीतगार, जाणता, पंडित, कुशल
३६३) तोरा – दिमाख, डौल, ऐट, नखरा
३६४) थट्टा – चेष्टा, मस्करी, विनोद
३६५) थंड – शीतल, शीत, गार
३६६) थवा – समुदाय, जमाव, गर्दी, चमू
३६७) थक्क – आश्चर्य, नवल, विस्मय, अचंबा
३६८) थकणे – दमणे, भागणे, श्रमणे, शिणणे
३६९) थांग – ठाव, पत्ता, माग, तळ
३७०) थाट – डामडौल, रुबाब
३७१) दुनिया – जग, इहलोक
३७२) दुबळा – दुर्बल, सामर्थ्यहीन, अशक्त
३७३) दुदैवी – आभागी, दैवहीन, भाग्यहीन, दुर्भाग्यशाली
३७४) देऊळ – मंदिर, देवालय, राऊळ
३७५) देव – सुर, अमर, ईश्वर, भगवान, ईश, परमेश्वर, प्रभू
३७६) देखणी – सुंदर, रुपवती, सुरुप, लावण्यवती
३७७) दैन्य – हालाखी, गरिबी, हीनपणा
३७८) दैव – नशीब, भाग्य, प्रारब्ध, ललाट, तकदीर
३७९) धनी – मालक, स्वामी, पती
३८०) धन – संपत्ती, दौलत, द्रव्य, संपदा, पैसा, वित्त
३८१) निकड – लकडा, तगादा, हव्यास, गरज
३८२) निखालस – स्पष्ट, साफ, निश्चित
३८३) नित्य – नेहमी, सतत, सदा, सदोदित
३८४) निपुर – निष्णात, कुशल, प्रविण
३८५) निबिड – दाट, गडद, घनदाट
३८६) नौबत – नगारा, डंका, प्रसिध्दती, कीर्ती
३८७) पत्नी – भार्या, बायको, अर्धांगिनी, कांता, दारा, जाया, अंबुली, अस्तुरी
३८८) पराक्रम – शौर्य, विक्रम, प्रताप, बहादुरी
३८९) प्रबंध – व्यवस्था, तजवीज, उपाययोजना
३९०) प्रवासी – वाटसरु, पांथ, पांथस्थ
३९१) पाय – पद, चरण, पाद
३९२) पात्र – लायक, योग्य
३९३) प्राण – जीवन, आत्मा, श्वास
३९४) प्रासाद – वाडा, महाल
३९५) पुष्प – फूल, कुसुम, सुमन, सुम, आरल
३९६) प्रेम – प्रीती, लोभ, अनुराग, ममता
३९७) माकड – वानर, मर्कट, कपी, शाखामृग
३९८) माणूस – मनुष्य, मनुज, मानव, नर
३९९) मित्र – दोस्त, सवंगडी, साथीदार, सोबती, स्नेही, सखा
४००) मुलगा – पुत्र, सुत, तनय, आत्मज, नंदन
४०१) मेळ – संयोग, संगम, मिलन, मिलाफ
४०२) यश – जय, विजय
४०३) मेंदू – मगज, बुध्दी, अक्कल
४०४) यत्न – प्रयत्न, खटपट, उद्योग, परिश्रम
४०५) यज्ञ – याग, मख, होम, धर्मकृत्य
४०६) युध्द – लढाई, संगर, झुंज, संग्राम, समर, रण
४०७) योग्य – लायक, रास्त, अनुरुप, उचित
४०८) रजक – धोबी, परीट
४०९) फत्ते – सरशी, जय, यश
४१०) फजीत – लज्जित, विरमलेले, ओशाळलेले
४११) विस्तीर्ण – विशाल, विस्तृत, अफाट
४१२) वीज – विद्युत, विद्युल्लता, चपला, चंचला, तडित, बिजली, सौदामिनी
४१३) वेष – पोशाख, पेहराव, कपडे
४१४) वेदना – यातना, कळ, दु:ख, व्यथा, शूळ, क्लेश, पीडा
४१५) वैभव – ऐश्वर्य, श्रीमंती, थाटमाट
४१६) व्याधी – रोग, आजार, पीडा
४१७) शक – शंका, संशय, संदेह
४१८) शंकर – महेश, महादेव, शिव, सांब, उमाकांत
४१९) शत्रू – अरि, दुश्मन, वैरी
४२०) शासन – एक अर्थ – सरकार, दुसरा अर्थ – शिक्षा
४२१) शागीर्द – शिष्य, विद्यार्थी, चेला, अनुयायी
४२२) शिकस्त – प्रयत्न, पराकाष्टा
४२३) शिक्षा – शासन, दंड, मार, सजा
४२४) शेखी – प्रौढी, बढाई, फुशारकी, ऐट
४२५) शेतकरी – कृष, कृषीक, कृषिवल, किसान
४२६) श्रांत – दमलेला, थकलेला, कुंटाळलेला, कष्टी
४२७) समस्त – सकल, सर्व, संपूर्ण, सगळे
४२८) सत्कार – गानसन्मान, मानमरातब, आदरसत्कार
४२९) सरदार – उमराव, मानकरी, प्रमुख
४३०) समुद्र – सागर, दर्या, सिंधू, रत्नाकर, अंबुधी, जलधी, नीरराशी, पयोधी, अर्णव, उदधी
४३१) सह्याद्री – सह्यपर्वत– सह्याचल, सह्यागिरी
४३२) नारळ – श्रीफळ, नारिकेल
४३३) निलीजरा – निर्लज्ज, बेशरम
४३४) पणती – दिवली, दिवलाणी

लक्ष्य करीयर अकॅडमी

## २५. एकाच शब्दाचे भिन्नभिन्न अर्थ

१) गदा – एक शस्त्र, संकट
२) गज – हत्ती, खिडकीचा गज, लांबी मोजण्याचे एक साधन
३) गंज – एक उभट भांडे, लोखंडी वस्तूवर चढणारा गंज
४) गोम – अनेक पायांचा एक प्राणी, वैगुण्य, मख्खी
५) ग्रह – मत, आकाशातील ग्रह
६) घन – मेघ, दाट किंवा भरीव, अंकाचा किंवा संख्येचा घन
७) चपला – वीज, वहाणा
८) चाल– गती, हल्ला, पध्दती
९) जलाल – तीक्ष्ण, तिखट, उग्र, तापट, कडक, जालीम, रखरखीत, जाज्वल्य जळत जाणारे औषध, भेदक, क्लेशदायक, जुलूम, जबरदस्ती, उग्रता
१०) जलद – वेगाने, मेघ
११) जागा – ठिकाण, जागृत असलेला
१२) जीवन – आयुष्य, पाणी
१३) ताव – यथेच्छ खाणे, कागदाचा ताव
१४) तीर – नदीचा किनारा किंवा काठ, बाण
१५) दल – पाकळी, सेना विभाग
१६) दंड – शिक्षा, काठी (ध्वंजदंड, राजदंड वगैरे), शरीराचा एक अवयव
१७) व्दिज – पक्षी, ब्राह्मण, दात
१८) नाव – होडी, वस्तू किंवा प्राण्याचे नाव
१९) नाद – आवाज, छंद
२०) पत्र – पान, एखाद्याला लिहिलेले पत्र
२१) पय – पाणी, दूध
२२) पर – पीस, परका
२३) पाट – बसण्याचा पाट, पाण्याचा पाट, विवाहाचा दुय्यम दर्जाचा प्रकार
२४) पक्ष – बाजू, पंधरावडा, पंख
२५) पूर – नगर, नदी, ओढे यांना येणारा पूर
२६) पात्र – लायक, योग्य, व्यक्तीरेखा, नाटकात काम करणारी व्यक्ती
२७) पट – आकाश, वस्त्र, खेळाचा पट (बुध्दीबळाचा, सोंगटयाचा पट)
२८) पण – प्रतिज्ञा, परंतु या अर्थी,अट
२९) भाव – भक्तिभाव वा श्रध्दा, वस्तूचा दर
३०) मान – शरीराचा एक भाग, प्रमाण, मोठेपणा
३१) मात्रा– इलाज किंवा उपाय, ठराविक प्रमाणातील औषध
३२) माया–धन, संपत्ती, प्रेम, वात्सल्य
३३) अनंत – अमर्याद, विष्णू, शेष, आकाश
३४) अमल – शुध्द, स्वच्छ, खडीसाखर, शिकेकाई, अधिकार, ताबा, कैफ, नशा
३५) अयनक – चष्मा, उपनेत्र, आरसा, काच
३६) अशय – पराभव, अपमान, चैन, ऐषाराम
३७) अवकाश – अवधी, वेळ, सवड, रिकामी जागा,भेद, विलंब, सामर्थ्य, अकाल, वाईट वेळ, पुष्कळ, पोटभर, आकाश
३८) आकडा – संख्या, अंक, बाकदार टोक, विंचवाची किंवा खेकडयाची नांगी, मिरची, चिंच, टोक, शेंडा, छत्रीचा घोडा, अंगठा
३९) आकडी – थंडीने भरणारे कापरे, पोटातील रोक, उंचावरील वस्तू तोडण्यासाठी काठीला कोयती बांधुन केलेले साधन, निरसे दूध
४०) आख – डोळा, संख्या, रक्कम, शेंडा, आस, कणा
४१) आगार – घर, मंदिर, वाडा, संचय, खाण, अंकुर
४२) आट – अट, हट्ट, अभिमान वेढा, संताप, नाश, शेवट, मऊ होण्यासाठी कण्या उकडून त्यात पीठ घालून करतात त्या शिजलेल्या तांदळाच्या कण्या
४३) आय – आई, नफा, उत्पन्न, कुंडलीतील अकरावे स्थान, अलुते, बलुते, लोखंड, आरोप, आकार, स्वरुप
४४) आयगी – इच्छा, हेतू, मन, बुध्दी, मत, चांगली चाल, सामर्थ्य, मालिका, चातुर्य, युक्ती, अभिमान, पंखा
४५) उत्तर – उत्तर दिशा, प्रश्नाचे उत्तर
४६) उदास – दु:खी, खिन्न, बेपर्वा, निरपेक्ष, विरक्त, व्यर्थ, ओसाड, निस्तेज
४७) उदाहरण – दाखला, दृष्टान्त, नमुना
४८) ओढ – आकर्षण, हिसका, ताण, अडचणीची स्थिती, कल, हौस, तृष्णा, इच्छा
४९) ओस – निर्जन, रिकामा, शून्य, नारळ, केळी इत्यादीचे सोपट, काथ्या, नाकाच्या आतील हाड, दव, धुके, झाडाची सावली
५०) ओढा – प्रवाह, कल, आकर्षण

लक्ष्य करीयर अकॅडमी

## २६. विरुध्दार्थी शब्द

धिटाई X भिन्नेपणा
नम्र X उध्दट
लायक X नायायक
समर्थ X असमर्थ
स्मरण X विस्मरण
प्रगती X अधोगती
शत्रुत्व X मित्रत्व
शाप X वरदान
शिस्त X बेशिस्त
सहेतुक X निर्हेतुक
सुज्ञ X अज्ञ
सोवळे X ओवळे
संकुचित X विशाल
सजातीय X विजायती
मृत X जिवंत
माजी X आजी
राजमार्ग X आडमार्ग
संदिग्ध X असंदिग्ध
विकारी X अविकारी
नोकर X मालक
परिहार्य X अपरिहार्य
वेध X निर्वेध
स्वदेश X परदेश
संशय X नि:संशय
पूर्णांक X अपुर्णांक
कबूल X नाकबुल
मर्द X नामर्द
इलाज X नाईलाज
हजर X गैरहजर
हार X जीत
सोय X गैरसोय
स्वीकार X धिक्कार
कृपा X अवकृपा
पात्र X अपात्र
सन्मान X अपमान
होकार X नकार
सुलभ X दुर्लभ

उन्नती X अवनती
कठोर X मृदू
सुकाळ X दुष्काळ
इहलोक X परलोक
कायदेशीर X बेकायदेशीर
कृत्रिम X नैसर्गिक
गद्य X पद्य
सुवार्ता X दुवार्ता
सुविचार X कुविचार
रागीट X प्रेमळ
उघड X गुप्त
उष्ण X शीतल
अंधार X उजेड
शंका X खात्री
लक्ष X दुर्लक्ष
सावत्र X सख्खा
साशंक X नि:शंक
ज्ञानी X अज्ञानी
सुखकारक X दु:खकारक
सुदैव X दुदैव
सुप्रसिध्द X कुप्रसिध्द
सुमती X दुर्मती
सभ्य X असभ्य
क्षम्य X अक्षम्य
आशीर्वाद X शाप
आकाश X पाताळ
लवकर X सावकाश
लांब X आखूड
वर X वधू
काळा X पांढरा
उचित X अनुचिंत
हर्ष X खेद
अब्रु X बेअब्रु
जीर्ण X मजबूत
बुध्दिमान X मठ्ठ
अजाण X सुजाण
आगमन X निर्गमन

स्वाधीन X घराधीन
उत्तर X दक्षिण
जमा X खर्च
श्रृत X अश्रृत
तेजस्वी X निस्तेज
उपाय X निरुपाय
एकवचन X अनेकवचन
अध्ययन X अध्यापन
अभिमान X दुराभिमान
कृतज्ञ X कृतघ्न
परवानगी X मनाई
शाश्वत X अशाश्वत
क्षणभंगुर X चिरकालीन
सौभाग्य X वैधव्य
साम्य X भेद
ग्रामीण X शहरी
तारक X मारक
उद्योग X निरुद्योगी
निर्मळ X मळका
पाप X पुण्य
पूर्व X पश्चिम
कृश X स्थूल
सहकार X असहकार
स्वावलंबन X परावलंबन
जेष्ठ X कनिष्ठ
सुबोध X दुर्बोध
विनाशी X अविनाशी
विश्वास X अविश्वास
पवित्र X अपवित्र
प्रत्यक्ष X अप्रत्यक्ष
आज्ञा X विनंती
हार X जीत
उजवा X डावा
वैयक्तिक X सार्वजनिक
अतिवृष्टी X अवर्षण
अमाप X अल्पसे
अवजड X हलके


लक्ष्य करीयर अकॅडमी

आरोग्य X अनारोग्य
साधार X निराधार
सामान्य X असामान्य
भद्र X अभद्र
तिरका X सरळ
दीर्घ X ऱ्हस्व
दोषी X निर्दोषी
हरकत X संमती
शकुन X अपशकून
शांत X अशांत
शिष्ट X अशिष्ट
शेष X नि:शेष
बिंब X प्रतिबिंब
सत्कर्म X दुष्कर्म
सदुपयोग X दुरुपयोग
मान्य X अमान्य
चिमुकले X विशाल
प्रजा X राजा
कष्टाळू X आळशी
शुभ X अशुभ
सगुण X निर्गुण
सज्जन X दुर्जन
सदाचारी X दुराचारी
शांत X तापट
ऱ्हास X विकास
तिटकारा X प्रेम
अधोगती X प्रगती
सुपीक X नापीक
साधरण X असाधारण
भय X निर्भय
तफावत X साम्य
मूर्ख X शहाणा
अभागी X भाग्यवान
अनिवार्य X ऐच्छिक
रसिक X अरसिक
घनदाट X विरळ
कडक X सौम्य
कल्पित X अकल्पित

अहंकार X नम्रता
आधार X निराधार
इच्छा X अनिच्छा
चव X बेचव
उत्पन्न X खर्च
उदय X अस्त
बंधू X भगिनी
सकर्मक X अकर्मक
मंजूळ X कर्कश
सदाचरण X दुराचरण
सद्‌गुण X दुर्गुण
सनातनी X पुरोगामी
न्याय X अन्याय
निती X अनिती
वंद्य X निंद्य
विकास X ऱ्हास
स्वर्ग X नरक
प्रसरण X आकुंचन
पुढारलेला X मागासलेला
सहज X मुद्दाम
साध्य X असाध्य
सार्थक X निरर्थक
सावध X बेसावध
मुका X बोलका
सजीव X निर्जीव
देव X दानव
दोस्ती X वैर
नफा X तोटा
लवचिक X ताठर
लोभ X निर्लोभ
संभव X असंभव
पर्वा X बेपर्वा
प्रतिष्ठा X अप्रतिष्ठा
शांती X अशांती
श्रांत X अविश्रांत
सह्य X असह्य
सुसंगत X विसंगत

सुर्योदय X सुर्यास्त
सौंदर्य X कुरुपता
सचेतन X अचेतन
थोरला X धाकटा
महात्मा X दुरात्मा
रसाळ X नीरस
रुंद X अरुंद
स्पृश्य X अस्पृश्य
समाधान X असमाधान
पक्के X कच्चे
वियोग X संयोग
शंका X खात्री
स्वस्थ X अस्वस्थ
सशस्त्र X नि:शस्त्र
सुशिक्षित X अशिक्षित
बाद X नाबाद
राजी X नाराजी
उपद्रवी X निरुपद्रवी
हसणे X रडणे
हित X अहित
सोय X गैरसोय
हर्ष X खेद
शक्य X अशक्य
श्वास X उच्छवास
सुरेल X बेसूर
पौर्णिमा X अमावस्या
बिकट X सुलभ
संन्यासी X संसारी
मागासलेला X पुढारलेला
नीरस X मनोरंजक
दुर्लक्ष X लक्ष
खिन्न X प्रसन्न
घनदाट X विरळ
आत X बाहेर
संघटन X विघटन
सबळ X दुर्बळ
शीघ्र X मंद
कोमल X तीव्र

लक्ष्य करीयर अकॅडमी

## २७. म्हणी व त्याचे अर्थ

**म्हण** **अर्थ**

१) मान सांगावा जना, अपमान सांगावा मना. = आपला मान – सन्मान जगाला सांगावा, पण अपमान मात्र मनातच राहू द्यावा.

२) मानला तर देव, नाहीतर धोंडा = मनापासून श्रध्दा असली तरच दगडातही देवगण येते. श्रध्दा नसल्यास देवाची मूर्ती केवळ दगडच असते.

३) मारणाराचा हात धरवतो, पण बोलणाराचे तोंड धरवत नाही. = दांडग्या माणसाला आवरणे सोपे, पण बोलणाऱ्याला आवरणे अवघड असते.

४) मी तर मरेनच, पण तुलाही रंडकी करेन. = स्वत:चे नुकसान करणे व व्देषाने दुसऱ्याचेही नुकसान करणे.

५) झोपेला धोंडा अन् भुकेला कोंडा = थकवा आल्यावर कोठेही झोप येते. कडाडून भूक लागल्यावर कण्याकोंडया –चे अन्नही गोड लागते.

६) टाक्याच्या धाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही. = अतोनात कष्ट केल्याशिवाय उत्कर्ष होत नाही, मोठेपणा मिळत नाही.

७) टिटवीने आटविला समुद्र. = क्षुद्र मनुष्य सुध्दा प्रसंग पडल्यास मोठे काम करु शकतो.

८) डोंगर पोखरुन उंदीर काढला. = खूप प्रयत्न केल्यानंतरही थोडेसे यश मिळणे. थोडयाशा लाभासाठी फार मोठी यातायात करणे.

९) डोंगराएवढी हाव आणि तिळाएवढा धाव = महत्त्वाकांक्षा खूप मोठी असली, तरी तिच्या पूर्ततेकरिता अंगी कुवतच नसणे.

१०) डोळयात आसू अन् तोंडात हसू = कधीकधी असा प्रसंग येतो की, रडावेसे वाटते व आनंदही होतो. त्यामुळे आपोआप हसुही येते.

११) फासा पडेल तो डाव,राजा बोलेल तो न्याय. = राजाने दिलेला न्याय सर्वांनाच मानावा लागे.

१२) फुलाचा वास भुंग्याला, मुळाचा चिखल बेडकाला. = ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे काय हवे ते मिळणे.

१३) फुल ना फुलाची पाकळी. = आपापल्या कुवतीप्रमाणे जे काही देता येईल, ते देणे.

१४) बहिऱ्यापुढे भाषण नि आंधळ्यापुढे दर्पण. = सगळ्या गोष्टी निरर्थक असणे.

१५) बाजारात तुरी अन् भटणीला मारी. = जी गोष्ट अजून पुढे घडायची आहे, तिच्याविषयी आधीच वाद घालीत बसणे. आपसात भांडणे.

१६) बाप दाखव, नाहीतर श्राध्द कर. = निर्दोष असल्यास पुरावा दाखवा, नाहीतर अपराध कबूल करा.

१७) अग अग म्हशी, मला कुठे नेशी? = स्वत:ला हवी असलेली गोष्ट, ती दुसऱ्याच्या आग्रहामुळे करावी लागली असे दाखविणे.

१८) अंगापेक्षा बोंगा जड = आहे त्या परिस्थितीपेक्षा जास्त मोठेपणा मिरविणे.

१९) अडला हरी निं गाढवाचे पाय धरी = अडचणीच्या प्रसंगी मूर्ख माणसाची सुध्दा खुशामत करावी लागते.

२०) अडली गाय अन् फटके खाय = अडचणीत सापडलेल्या माणसाला आणखी त्रास देण्याचा प्रकार.

२१) अढीच्या दिढी अन् सावकराची गढी = अडचणीत सापडलेल्या मनुष्य अखेरीस सावकराच्या पाशात अडकतो.

२२) अंतकाळापेक्षा मध्यान्हकाळ कठीण = मरणाच्या वेदनांपेक्षा भुकेच्या वेदना अत्यंत क्लेशदायी असतात.

२३) अंधारात केले, उजेडात आले. = एखादी गोट कितीही गुप्तपणे केली, तरी ती केव्हातरी उघडकीस येतेच.

२४) हातच्या कंकणाला आरसा कशाला? = प्रत्यक्ष समोर दिसणाऱ्या गोष्टीसाठी पुराव्याची जरुरीच नसते.

२५) हिरा तो हिरा नि गार ती गार. = गुणी माणसाचे गुण प्रकटपणे दिसत असतातच.

| म्हण | अर्थ |
|---|---|

१३९) ओठात एक नि पोटात एक. = प्रकटपणे बोलायचे वेगळे नि मनात मात्र विचार करायचा वेगळाच.

१४०) ओठी तेच पोटी = बोलावे तसेच वागावे.

१४१) ओल्याबरोबर सुकेही जळते. = दुष्टांच्या करणीने त्यांचे नुकसान तर होतेच, पण त्याबरोबर सज्जनांनाही त्रास भोगावा लागतो.

१४२) कडू कारले तुपात तळले, साखरेत घोळले, तरी ते कडूते कडूच = कितीही उपाय केले, तरी माणसाचा मूळ स्वभाव बदलत नाही.

१४३) कमरेचे सोडले नि डोईला बांधले. = पार लाजलज्जा सोडून देणे.

१४४) कर नाही त्याला डर कशाला? = ज्याच्या हातून वाईट कर्म घडले नाही, त्याला भीती बाळगण्याचे कारणच नाही.

१४५) करावे तसे भरावे = आपल्याकडून जसे कर्म घडते, तशीच त्याचे फळे भोगावी लागतात.

१४६) धन्याचे हाल अन् कुत्रे झाले लाल. = मालकाचे नुकसान होणे व दिवाणजी मात्र गबर होणे.

१४७) धरले तर चावते नि सोडले तर पळते. = एखादी गोष्ट अंगीकारताही येत नाही व ती सोडूनही देता येत नाही, अशी विचित्र स्थिती.

१४८) नखऱ्याची नार अन् नवऱ्याचे हाल. = नखरेबाज बायकोचे चोचले पुरवता पुरवता नवरा मेताकुटीस येतो.

१४९) नखाने होणाऱ्या कामासाठी कुऱ्हाड कशाला हवी? = क्षुल्लक साधनाने होणाऱ्या कामासाठी मोठया साधना–ची आवश्यकता नसते.

१५०) खायला काळ अन् भुईला भार. = खादाड पण निरुपयोगी,निरुद्योगी मनुष्य.

१५१)खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे. = वर दाखवायचे एक आणि मनात मात्र भलतेच असे ढोंग.

१५२) खिशात नाही दमडी अन् म्हणे आणा कोंबडी = आपली कुवत नसताना व्यवहार करु पाहणे.

१५३) खिळ्यावाचून नाल गेला अन् नालावाचून घोडा गेला. = क्षुल्लक बाबीकडे कानाडोळा केला, तर त्याचे परिणाम भयंकर होतात.

१५४) खुंटयाची सोडली आणि झाडाला बांधली. = इथे काय नि तिथे बंधनच–स्वातंत्र्य नाहीच.

१५५) खोटयाची होय माती खऱ्याची वाढे कीर्ती. = खोटी कामे करणाऱ्याची धूळधाण होते आणि खरेपणाने वागणाऱ्याची किर्ती वाढते.

१५६) खोटयाच्या कपाळी सोटा = खोटेपणा करणाऱ्या माणसाला त्याचा त्रास भोगावा लागतो.

१५७) गरज सरो नि वैद्य मरो. = ज्याने आपणास ऐनवेळी मदत केली,त्यालाच विसरुन जाणे.

१५८) गरजवंताला अक्कल नसते. = गरजेमुळे अडचणीत आलेल्या माणसाला दुसऱ्याची बोलणी निमूटपणे एकून घ्यावी लागतात.

१५९) गर्जेल तो पडेल काय? = बडबडया माणसांकडून कार्य होत नाही.

१६०) गर्वाचे घर खाली. = गर्व करणाऱ्याला शेवटी अपमान सहन करावा लागतो.

१६१) चोराच्या मनात चांदणे. = वाईट कर्मे करणाराला, ती उघडकीस येण्याची नेहमी भीती वाटत असते.

१६२) चोरावर मोर. = एकापेक्षा दुसरा वरचढ

१६३) जगी सर्व सुखी असा कोण आहे? = ज्याला सर्व सुखे प्राप्त झालेली आहेत, असा मनुष्य जगात शोधूनही सापडणार नाही.

१६४) जपेल त्याची लक्ष्मी, खपेल त्याचे शेत. = संपत्तीची जपणूक करणाऱ्या जवळच ती राहते. तसेच शेताची मशागत करणाऱ्यालाच चांगला लाभ होतो.

१६५) जमिनीचे फूल, चालवी जगाची चूल. = जमिनीच्या वरच्या थरात जमिनीचा कस असते व त्यावरच जगाचे भरणपोषण करणारे अन्नधान्य पिकते.

लक्ष्य करीयर अकॅडमी

## २८. वाक्प्रचार

| वाक्यप्रचार | अर्थ |
|---|---|
| १) तोंड उष्टे करणे | – अत्यंत थोडे खाणे. |
| २) तोंड काळे करणे | – दोषी ठरल्याने लांब निघून जावे लागणे. |
| ३) तोंड दाखविणे | – बऱ्याच काळानंतर समोर दिसणे, येणे. |
| ४) तोंडपूजेपणा करणे, तोंडपूजा करणे | – समोर गोड गोड बोलणे, खुशामत करणे. |
| ५) तोंड सांभाळून बोलणे | – मर्यादा सांभाळून, सभ्यपणे बोलणे. |
| ६) तोंडाचा पट्टा सुरु करणे | – शिव्यांचा भडिमार सुरु करणे. |
| ७) तोंडाचे बोळके होणे | – सगळे दात पडून जाणे. |
| ८) तोंडात तीळ न भिजणे | – कोणतीही गुप्त गोष्ट प्रकट करणे. |
| ९) तोंडात बोटे घालणे | – आश्चर्य वाटणे. |
| १०) तोंडात मारुन घेणे | – फजिती झाल्यावर धडा शिकणे, स्वत:च्या जिवाला त्रास करुन घेणे. |
| ११) हात गगनाला टेकणे | – अतिशय गर्व होणे. |
| १२) हात घाईची लढाई होणे | – निकराची लढाई होणे. |
| १३) हात चलाखी करणे | – हातोहात फसविणे, बोलता बोलता फसविणे. |
| १४) हातचे राखून काम करणे | – कामचुकारपणा करणे. |
| १५) हात झटकून मोकळे होणे | – जबाबदारी टाळणे. |
| १६) हात तोकडे पडणे | – कामचुकामदत करण्याची क्षमता संपणे. |
| १७) हात धुऊन पाठीस लागणे | – एखाद्याला कायम त्रास देत राहणे. |
| १८) हातपाय हलविणे | – काहीतरी उद्योग करीत राहणे. |
| १९) हातमिळवणी करणे | – समझोता करणे, मते जुळवून घेणे. |
| २०) हाताचा पाळणा करुन सांभाळणे | – अतिशय काळजीपुर्वक पालन–पोषण करणे. |
| २१) हातातोंडाची गाठ पडणे | – दररोज जेमतेम खावयास मिळणे. |
| २२) अकलेचे तारे तोडणे | – अविचाराने बडबड करणे. |
| २३) अकांड तांडव करणे | – आरडाओरड करणे. |
| २४) अक्कल खर्ची घालणे | – खूप विचार करणे. |
| २५) अक्कल पुढे धावणे | – बुध्दीचा भलताच उपयोग करणे. |
| २६) अंग काढून घेणे | – संबंध तोडणे. |
| २७) अंग झटकून टाकणे | – नाकबूल होणे, संबंध तोडणे. |
| २८) अंग मोडून काम करणे | – अतिशय कष्ट करणे. |
| २९) अंगाचा तिळपापड होणे | – खूप संताप करणे, चडफडात होणे. |
| ३०) अंगाची लाही लाही होणे | – अतिशय संतापणे. |
| ३१) अंगाचे कातडे काढून जोडे शिवणे | – एखाद्यासाठी खूप झीज सोसणे, खूप सेवा करणे. |
| ३२) अंगावर काटा उभा राहणे | – अतिशय भीती वाटणे. |
| ३३) अंगावर धावून जाणे | – मारायला धावणे. |
| ३४) ताटाखालचे मांजर असणे | – पूर्णपणे दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणे वागणे, लाचार बनणे. |
| ३५) तापल्या तव्यावर पोळी भाजून घेणे | – मिळालेल्या संधीचा लाभ उठविणे |
| ३६) तार छेडली जाणे | – भावना उत्कटतेने जागृत होणे |

लक्ष्य करीयर अकॅडमी

| वाक्यप्रचार | अर्थ |
|---|---|
| ७४) तोंडाला कुलूप घालणे | – गप्प बसणे, मुळीच न बोलणे. |
| ७५) तोंडाला पाणी सुटणे | – मोह उत्पन्न होणे, हाव सुटणे. |
| ७६) तोंडाला पाने पुसणे | – फसविणे, छकविणे. |
| ७७) तोंडावर थुंकणे | – छिः थूः करणे, धिक्कार करणे. |
| ७८) तोंडावरची माशी न उडणे | – अगदीच गरीब, बावळा असणे. |
| ७९) तोफेच्या तोंडी देणे | – मोठया संकटात लोटणे, दुष्परिणाम भोगण्यास पुढे करणे. |
| ८०) त्रेधातिरपीठ उडणे | – अतिशय गोंधळून जाणे, धांदल उडणे. |
| ८१) थंडा फराळ करणे | – उपाशी राहणे, काहीही न खाणे. |
| ८२) थांग न लागणे, थांगपत्ता न लागणे | – मुळीच न समजणे, शोधूनही न सापडणे. |
| ८३) थोतांड निर्माण करणे | – लबाडीने खोटया गोष्टी करणे. |
| ८४) थोबाडात माती घालणे | – लाजविणे. |
| ८५) अब्रूवर पांघरूण घालणे | – इज्जत सांभाळणे, प्रतिष्ठा जपणे. |
| ८६) अलभ्य लाभ होणे | – मिळण्यास कठीण असा लाभ होणे. |
| ८७) अल्लाची गाय असणे | – अत्यंत गरीब व निरुपद्रवी असणे. |
| ८८) अवदसा आठवणे | – स्वतःहोऊन संकटात पडणे. |
| ८९) अवलोकन करणे | – निरीक्षण करणे, नीट पाहणे. |
| ९०) अवाक्षर न बोलणे | – एकही शब्द न बोलणे. |
| ९१) अस्मान ठेंगणे होणे | – गर्वाने फार फुगून जाणे. |
| ९२) अक्षता पडणे | – लग्न होणे. |
| ९३) आकाशपातळ एक करणे | – खूप आरडाओरड करणे. |
| ९४) आकाश ठेंगणे होणे | – अतिशय आनंद होणे. |
| ९५) आकाशाची कुऱ्हाड कोसळणे | – फार मोठे नैसर्गिक संकट येणे. |
| ९६) सूर्य मावळतीकडे झुकणे | – सायंकाळ होणे. |
| ९७) सोनाराने कान टोचणे | – योग्य व्यक्तीने कान उघाडणी करणे. |
| ९८) सोनेरी अक्षरात नोंदणे | – कायमचे कोरणे, कायम लक्षात राहील असे करणे. |
| ९९) सोन्याचा धूर निघणे | – अतिशय श्रीमंती असणे. |
| १००) सोन्याचे दिवस येणे | – सगळी सुखे प्राप्त होणे. |
| १०१) सौभाग्य संन्यास घेणे | – (स्त्रीने) केशवपन करणे. |
| १०२) स्त्रीच्या नाकावर पदर येणे | – एखाद्या स्त्रीचा नवरा मरण पावणे. |
| १०३) स्वप्न रंगविणे | – कल्पना करीत बसणे. |
| १०४) स्वर्ग दोन बोटे उरणे | – गर्वाने फुगून जाणे. |
| १०५) स्वर्गास हात पोचणे | – धन्यता वाटणे, अतिशय आनंद होणे. |
| १०६) दगड टाकूण ठाव पाहणे | – दुसऱ्याच्या मनातील भेद खुबीने काढण्याचा प्रयत्न करणे. |
| १०७) दगडाला पाझर फुटणे | – निर्दयी व्यक्तीच्या मनात दया उत्पन्न होणे. |
| १०८) दगडाला शेंदूर फासणे | – एखाद्याला उगाच मोठेपणा देणे. |
| १०९) दगडाखालून हात काढून घेणे | – मोठया जबाबदारीतून निसटून जाणे. |
| ११०) दत्त म्हणून उभे राहणे | – अचानक हजर होणे. |

| वाक्यप्रचार | अर्थ |
|---|---|
| १४८) वाहत्या गंगेत हात धुऊन घेणे | – अनायासे आलेल्या संधीचा फायदा उठविणे. |
| १४९) विकतचे श्राध्द घेणे | – नसती कटकट मागे लावून घेणे. |
| १५०) विचारांना पंख फुटणे | – विचार करण्याची प्रतिज्ञा करणे. |
| १५१) विषाची परीक्षा पाहणे | – भयंकर धाडस करणे. |
| १५२) वरश्री संचारणे | – अंगात शौर्याचे वारे संचारणे, अत्यंत आवेश चढणे. |
| १५३) उराशी बाळगणे | – मनात आशा बाळगणे. |
| १५४) उलटी अंबारी हाती येणे | – भीक मागण्याची पाळी येणे. |
| १५५) उन–वारा न लागणे | – मुळीच त्रास न होणे. |
| १५६) ऋणानुबंध असणे | – स्नेहसंबंध असणे, मैत्रीचे संबंध असणे. |
| १५७) एका पायावर तयार असणे | – एखादी गोष्ट करण्यास तत्पर असणे. |
| १५८) एकाच माळेचे मणी असणे | – सगळे एकसारखे असणे. |
| १५९) एखाद्याच्या उरावर बसणे | – जबरदस्तीने काम करुन घेणे. |
| १६०) ओढूनताणून चंद्रबळ आणणे | – तयारी नसताना तयारी दाखविणे. |
| १६१) ओलीसुकी करणे | – खरे–खोटे करुन घेणे. |
| १६२) दाती तृण धरणे | – पराजय कबूल करणे, शरण येणे. |
| १६३) दारात हत्ती झुलणे | – अतिशय श्रीमंती असणे. |
| १६४) दावणीला बांधणे | – ताब्यात ठेवणे. |
| १६५) दिवसा मशाली लावणे | – पैशांची उधळपट्टी करणे. |
| १६६) दिवे ओवाळणे | – कुचकिमतीचा समजणे, तिरस्कार दाखविणे. |
| १६७) दु:ख वेशीवर टांगणे | – आपली पीडा लोकांस सांगणे. |
| १६८) दुधात साखर पडणे | – आनंदात आणखी भर पडणे. |
| १६९) दुधातुपाच्या गुळण्या करणे | – श्रीमंतीमुळे उन्मत्त होणे. |
| १७०) दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे | – दुसरा सांगेल तसे वागणे. |
| १७१) श्रीगणेशा होणे | – एखाद्या कामास सुरुवात होणे, आरंभ होणे. |
| १७२) श्रीमुखात देणे | – थोबाडीत मारणे. |
| १७३) सतीचे वाण घेणे | – अत्यंत अवघड काम करण्याचा निश्चय करणे. |
| १७४) संधान बांधणे | – कावेबाजपणाने संबंध जोडणे, एखादे काम करण्याची योजना करणे. |
| १७५) संभ्रमात पडणे | – गोंधळून जाणे. |
| १७६) समाधी घेणे | – जिवंतपणी जमिनीत पुरुन घेऊन प्राणत्याग करणे, इंद्रियांचे दमन करुन आत्मस्वरुपी लीन होणे. |
| १७७) समुद्रात सुई शोधणे | – यश मिळणार नाही असे काम करणे. |
| १७८) उखळ पांढरे होणे | – भरपूर संपत्ती मिळणे. |
| १७९) उखाळयापाखाळया करणे | – एकमेकांची बरीवाईट कृत्ये प्रकटपणे सांगणे. |
| १८०) उचलबांगडी करणे | – जबरदस्तीने हलविणे. |
| १८१) उजळ माथ्याने हिंडणे | – लाज न बाळगता फिरणे. |
| १८२) उंटावरुन शेळया हाकणे | – काम न करता उपदेश करणे. |
| १८३) उदरी शनी येणे | – अचानक संपत्तीचा लाभ होणे. |

लक्ष्य करीयर अकॅडमी

| वाक्यप्रचार | अर्थ |
|---|---|
| २५६) लगाम घालणे | – आळा घालणे, नियंत्रण घालणे. |
| २५७) लष्कराच्या भाकरी भाजणे | – नसत्या उठाठेवी करणे. |
| २५८) लक्ष्मी घरी येणे | – समृध्दी येणे, भरपूर पैसा मिळणे. |
| २५९) लक्ष्मीचा वरदहस्त असणे | – खूप श्रीमंती असणे. |
| २६०) लांडगेतोड करणे | – चहुबाजूंनी हल्ला करणे. |
| २६१) लालूच दाखविणे | – फितविण्यासाठी काहीतरी देऊ करणे. |
| २६२) कान कापून हातावर देणे | – डोळयादेखत फसविणे, वरताण करणे. |
| २६३) कान टवकारुन ऐकणे | – लक्ष देऊन ऐकणे. |
| २६४) कान फुंकणे | – लावालावी करणे, मनात भरविणे. |
| २६५) कानाडोळा करणे | – दुर्लक्ष करणे. |
| २६६) कानात तेल घालून निजणे. | – पूर्णपणे दुर्लक्ष करणे, उदासीन असणे. |
| २६७) कानामागून येऊन तिखट होणे | – मागाहून येऊन वरचढ होणे. |
| २६८) कानावर हात ठेवणे | – संबंध नाही असे दाखविणे, नाकारणे. |
| २६९) कामास येणे,कामी येणे | – लढाईत मरण येणे. |
| २७०) काळजाचे पाणी पाणी होणे | – दु:खाने व्याकूळ होणे. |
| २७१) काळजाचे कोळसे होणे | – दु:ख अनावर होणे. |
| २७२) काळजाला झोंबणे | – मनाला फार झोंबणे, मन व्यथित होणे. |
| २७३) नाक घासणे | – चूक कबूल करणे, क्षमा मागणे. |
| २७४) नाकदुऱ्या काढणे | – कळवळून विनवण्या करणे, पश्चात्तापाने नाक घासणे, क्षमा मागणे. |
| २७५) नाक मुठीत धरणे | – नाईलाजाने शरण जाणे. |
| २७६) नाकाने कांदे सोलणे | – उगीच पावित्र्याच्या गोष्टी सांगणे. |
| २७७) नाकापेक्षा माती जड असणे | – कनिष्ठ दर्जाचा मनुष्य वरिष्ठापेक्षा वरचढ होणे. |
| २७८) नाकाला मिरच्या झोंबणे | – एखाद्याचे बोलणे मनाला फार लागणे. |
| २७९) नाकासमोर चालणे | – सरळ मार्गाने चालणे. |
| २८०) नामकरण करणे | – विधिपुर्वक नाव ठेवणे. |
| २८१) नामशेष होणे | – पूर्णपणे नष्ट होणे. |
| २८२) नामानिराळे राहणे | – करुनसवरुन संबंध नसल्याचे दाखविणे. |
| २८३) नावलौकिक मिळविणे | – लोकांत चांगली प्रसिध्दी होणे. |
| २८४) लावण्याची मूर्ती असणे | – अत्यंत सुंदर असणे. |
| २८५) लेंढार पाठीस लागणे | – पुष्कळ मुलेबाळे असणे. |
| २८६) लोखंडाचे चणे खाणे | – खडतर प्रयत्न करणे. |
| २८७) लौकिक मिळविणे | – सर्वत्र प्रसिध्दी मिळणे, किर्ती होणे. |
| २८८) वकीलपत्र घेणे | – एखाद्याची बाजू घेऊन बोलणे. |
| २८९) वडीलकी गाजविणे | – मोठेपणाच्या अधिकाराने वागणे. |
| २९०) वनवास भोगणे | – हालअपेष्टा सोशीत भटकत राहणे. |
| २९१) वरवंटा फिरविणे | – पूर्ण विध्वंस करणे, सर्वनाश करणे. |
| २९२) वरात काढणे | – बेइज्जत करणे, धिंड काढणे, हाकलून लावणे. |

| वाक्यप्रचार | अर्थ |
|---|---|
| ३६६) फासा उलटा पडणे | – डाव फसणे, कार्य न होणे. |
| ३६७) फासा टाकून पाहणे | – धाडस करुन पाहणे, नशिबाची परीक्षा पाहणे. |
| ३६८) फुटाण्यासारखे उडणे | – अतिशय संतापून अंगविक्षेप करणे. |
| ३६९) फूल ना फुलाची पाकळी देणे | – आपल्या कुवतीप्रमाणे मदत देणे. |
| ३७०) फैलावर घेणे | – दोषी व्यक्तीची कानउघडणी करणे. |
| ३७१) पणाला लावणे | – पैजेला लावणे. |
| ३७२) पथ्यावर पडणे | – मनासारखे अनायासे घडणे. |
| ३७३) पदरमोड करणे | – एखाद्या कार्यासाठी स्वत:चा पैसा खर्च करणे. |
| ३७४) पदरास गाठ बांधणे | – आलेला अनुभव लक्षात ठेवणे, मिळालेले नीट सांभाळून ठेवणे. |
| ३७५) पदरी माप घालणे | – खात्री पटवून देणे. |
| ३७६) पराक्रमाची शर्थ करणे | – फार मोठा पराक्रम करणे. |
| ३७७) पराचा कावळा करणे | – फुगवून, खुलवून सांगणे. |
| ३७८) परिस्थितीला तोंड देणे | – आलेले संकट निवारण्यासाठी सज्ज होणे. |
| ३७९) पळता भुई थोडी होणे | – अत्यंत वेगाने पळणे. |
| ३८०) पांग फेडणे | – इच्छा पूर्ण करणे, चिंता दूर करणे. |
| ३८१) चौदावे रत्न दाखविणे | – मारणे, भरपूर चोप देणे. |
| ३८२) छत्तीसचा आकडा असणे | – एकमेकांत वैर असणे. |
| ३८३) छप्पर फाडून देणे | – अकस्मात भरपूर लाभ होणे. |
| ३८४) छाती पुढे करुन चालणे | – न घाबरता चालणे, ऐटीत चालणे. |
| ३८५) छातीला हात लावून सांगणे | – खात्रीपूर्वक सांगणे. |
| ३८६) जखमेवर मीठ चोळणे | – दु:खी अवस्थेत आणखी दु:ख देणे. |
| ३८७) जन्माचे दारिद्रय फिटणे | – गरिबी कायमची नष्ट होणे. |
| ३८८) जमदग्नीचा अवतार असणे | – अत्यंत संतापी असणे. |
| ३८९) जयजयकार करणे | – जयघोष करणे, प्रशंसा करणे. |
| ३९०) जळते घर भाडयाने घेणे | – नसता लचांड पाठीमागे लावून घेणे. |
| ३९१) गाभ्याला हात घालणे | – मुख्य गोष्टीकडे वळणे. |
| ३९२) गाल फुगणून बसणे | – रुसणे, राग आल्याने बसून राहणे. |
| ३९३) गाळण उडणे | – धैर्य नाहीसे होणे, भांबावून जाणे. |
| ३९४) गुळाचा गणपती असणे | –अंगात कसलेही कर्तृत्व नसणे. |
| ३९५) गौडबंगाल असणे | –काहीतरी भानगड असणे. |
| ३९६) घडा भरणे | –अपराध केल्याने शिक्षेस पात्र होणे. |
| ३९७) ठावठिकाणा नसणे | –पत्ता न लागणे, निश्चित ठिकाणा नसणे. |
| ३९८) डावे–उजवे करणे | – पक्षपात करणे, एकाशी एक तर दुसऱ्याशी दुसरेच असे वागणे. |
| ३९९) डोईवर हात फिरविणे | – सहज फसविणे. |
| ४००) डोके ठिकाणावर येणे | – शुध्दीवर येणे, नीट मार्गाला लागणे. |
| ४०१) डोके फिरवून घेणे | – संतापाने अविचारास प्रवृत्त होणे. |
| ४०२) डोके वर काढणे | – परिस्थिती सुधारणे, प्रगती होणे. |

| वाक्यप्रचार | अर्थ |
|---|---|
| ५१३) तहान लागल्यावर विहीर खोदणे | – गरज पडल्यावर व्यवस्था करण्यासाठी धावपळ करणे. |
| ५१४) तळपायाची आग मस्तकात जाणे | – खूप संतापणे. |
| ५१५) तळहाताचा पाळणा करणे | – अतिशय काळजी घेणे. |
| ५१६) तळहातावरील फोडासारखे जपणे | – खूप काळजी घेऊन वागविणे. |
| ५१७) ताकाला जाऊन भांडे लपविणे | – काही मागावयाचे असल्यास ते सरळ न मागता आढेवेढे घेऊन मागणे. |
| ५१८) पोपटपंची करणे | – सारखे बडबडत राहणे. |
| ५१९) प्रकृती तोळामासा असणे | – नाजूक प्रकृतीमुळे वरचेवर आजारी पडणे. |
| ५२०) प्रतिस्पर्ध्यास लोळविणे | – विरोधकाचा पूर्ण पराभव करणे. |
| ५२१) प्रश्नांची सरबती करणे | – एकसारखे प्रश्न विचारीत राहणे. |
| ५२२) प्राण ओवाळून टाकणे | – सर्वस्व अर्पण करणे. |
| ५२३) प्राणप्रतिष्ठा करणे | – (मूर्तीची) स्थापना करणे. |
| ५२४) प्रायश्चित घेणे | – केलेल्या चुकीबद्दल शिक्षा भोगणे. |
| ५२५) मसलत फुकट जाणे | – ठरविलेले घडून न येणे. |
| ५२६) मागचे लोण पुढे पोचविणे | – पूर्वीपासून चालत आलेले रीतीरिवाज तसेच चालू ठेवणे. |
| ५२७) मांडीस मांडी लावून बसणे | – बरोबरीच्या नात्याने बसणे. |
| ५२८) मातीआड करणे | – मातीखाली पुरणे, विसरुन जाणे. |
| ५२९) माती कालविणे | – एखाद्याच्या उदरनिर्वाहाचे साधन नष्ट करणे. |
| ५३०) माधुकरी मागणे | – विद्यार्थ्यांने घरोघरी जाऊन शिजल्या अन्नाची भिक्षा मागणे. |
| ५३१) मानकुटीवर बसणे | – समोर उभे राहून एखाद्याकडून काम करुन घेणे. |
| ५३२) बगला वर करणे | – कफल्लक असल्याने दाखविणे. |
| ५३३) बलिदान करणे | – सत्कार्यासाठी मरण पत्करणे. |
| ५३४) बस्तान बसविणे | – स्थिरस्थानावर होणे, कायमचे स्थिर होणे. |
| ५३५) बहिरेपणाचे सोंग घेणे | – ऐकूनही न ऐकल्यासारखे करणे. |
| ५३६) बांगडी बळकट असणे | – एखाद्या स्त्रीचा पती मोठया संकटातून वाचणे, स्त्रीचे सौभाग्य बळकट असणे. |
| ५३७) बांगडीचा जोर असणे | – बायकोचे वर्चस्व घरात असणे. |
| ५३८) भांडयाला भांडे लागणे | – एकत्र राहणाऱ्यांत भांडण होणे. |
| ५३९) भिकेचे डोहाळे लागणे | – दरिद्रीपणे जगणे. |
| ५४०) भीमाचे बळ असणे | – अंगात अतोनात शक्ती असणे. |
| ५४१) भुईत तोंड खुपसून बसणे | – लपून बसणे. |
| ५४२) भुईसपाट होणे | – नष्ट होणे, नाश पावणे. |
| ५४३) भुकेचा डोंब उसळणे | – कडाडून भूक लागणे. |
| ५४४) भोवऱ्यात सापडणे | – मोठया अडचणीत सापडणे. |
| ५४५) भ्रमजाल तुटणे | – चुकीच्या कल्पना मनातून दूर होणे. |
| ५४६) मगरमिठीतून सुटणे | – बंधनातून मोकळे होणे. |
| ५४७) मनमुराद हिंडणे | – मनास येईल तितके हिंडणे. |

लक्ष्य करीयर अकॅडमी

PERSONAL COPY
NOT FOR SALE OR CIRCULATION

LAKSHYA CAREER ACADEMY

मराठी व्याकरण व शब्दसंग्रह
Marathi Grammer & Vocabulary

इंग्रजी
English

भाषांतर व सारांशलेखन
Translation and synopsis writing

शालेय पुस्तके भाग-१
School books part-1

शालेय पुस्तके भाग-२
School books part-2

भारतीय राज्यघटना
Indian Constitution

गणित
Mathematics

बुद्धिमापन चाचणी
Reasoning

आधुनिक भारताचा इतिहास
Modern Indian History

लक्ष्य करिअर ॲकेडमी
FOR MPSC (राज्यसेवा) & PSI, STI, ASO
7887878001 / 7887878002 /groups/77926463145586
www.thelakshyaacademy.in lakshyacareeracademynashik@gmail.com
पत्ता : श्रीनाथ अपार्टमेंट, मुरकुटे लायब्ररी समोर, लेन नं.३, पंडीत कॉलनी, नाशिक-२

## - : लक्ष्य करिअर ॲकेडमी वैशिष्ट्ये : -

१) पूर्व + मुख्य + मुलाखत + शारीरिक चाचणी या सर्व भागांची परिपूर्ण तयारी
२) सर्व अभ्यासक्रमाची परिक्षेआधी उजळणी
३) प्रत्येक विषयाला स्वतंत्र तज्ज्ञ मार्गदर्शक/शिक्षक
४) टेस्ट सिरीज (एकूण ४०)
५) सर्व विषयांच्या छापील नोट्स
६) वृत्तपत्र वाचनातून चालू घडामोडींची पूर्णपणे तयारी
७) CSAT (क्लास मध्ये २०० उतार्यांची तयारी)
८) बुद्धिमापन चाचणी व गणित विषयासाठी विशेष लक्ष (प्रत्येक चाप्टर वर ५० प्रश्नांची तयारी)
९) अभ्यासिका पूर्णपणे मोफत
१०) एका बॅचमध्ये फक्त ३० विद्यार्थी
११) दररोज मुख्य परीक्षेसंदर्भातील प्रश्नांचा लेखी सराव
१२) अभ्यासासाठी दर १५ दिवसांनी वैयक्तिक मार्गदर्शन

LAKSHYA CAREER ACADEMY
Marathi Grammer & Vocabulary